क्रमांक ~~93294~~

सत्यमेव जयते

# नोंदणी प्रमाणपत्र

संस्था नोंदणी अधिनियम, १८६०
(१८६० चा अधिनियम २१)

नोंदणी क्रमांक महा/ 258/2020

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, Alumni Association of Anusayabai Ramchandra Burla Mahila Varishtha Mahavidyalaya Solapur. F09A/219705 Kamgar Kalyan Kendra Ravivar. peth, Solapur.

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरित्या नोंदणी करण्यात आली.

तारीख 13.03.2020 ~~२०~~ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

13.3.20

सहाय्यक संस्था निबंधक
सहाय्यक संस्था निबंधक
सोलापूर विभाग सोलापूर
विभाग

सहाय्यक संस्था निबंधक सोलापूर विभाग, सोलापूर

भाषिक (तेलुगू) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था
पद्मशाली शिक्षण संस्था संचलित

**अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर**

सिटी सर्व्हे क्र. ९७०५/९/अ/२अ, रविवार पेठ, राजेंद्र चौक, सोलापूर – ४१३००५

---

# अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटना

## २०२१ - २०२२

| अ. क्र. | सभासदाचे नांव | पद | सही |
|---|---|---|---|
| १ | प्राचार्य डॉ. राजेंद्र नारायण शेंडगे | अध्यक्ष | |
| २ | सौ. शिंदे मंजुळा तुकाराम | उपाध्यक्ष | |
| ३ | प्रा. डॉ. दळवी रजनी जयंत | सचिव | |
| ४ | सौ. धत्तुरे यशवंती रामचंद्र | सहसचिव | |
| ५ | सौ. शंकुर वैशाली सुदर्शन | खजिनदार | |
| ६ | प्रा. डॉ. भांजे शिवानंद बाबुराव | सदस्य | |
| ७ | प्रा. डॉ. राजे शंकर शिवाजी | सदस्य | |
| ८ | सौ. गुंडेली पुष्पलता मार्कंडेय | सदस्य | |
| ९ | सौ. कोडम अरुणा गोवर्धन | सदस्य | |
| १० | सौ. मेहेरकर स्नेहा नागनाथ | सदस्य | |
| ११ | कु. दाते काजल हणमंतु | सदस्य | |

*************

Meeting NO : 1

Date - 5-9-2021

2021-22

माजी विद्यार्थिनी संघटनेच्या सर्व समिती सदस्यांना कळविण्यात येते की माजी विद्यार्थिनी संघटनेची सभा दिनांक 8/9/2021 रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. मा. प्राचार्यांच्या कक्षेत सकाळी 11.30 वाजता सर्व सदस्यांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

डॉ. रजनी दळवी
(सचिव)

प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे
(चेअरमन)

A. R. Burla Mahila Mahavidyalaya * Solapur * ARBM

## AGENDA OF THE MEETING : विषयसूची :

विषय क्र. १ - मागील सभेच्या इतिवृत्तांत वाचून कायम करणे बाबत.

विषय क्र. २ - वर्कशॉपस् व सेमेनीर घेणे बाबत.

विषय क्र. ३ - womens Empowerment and Employability skill development skill अंतर्गत, शिबीर घेणे बाबत.

विषय क्र. ४ - महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनींच्या online meeting घेण्या बाबत.

विषय क्र. ५ - मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषया बाबत चर्चा करणे बाबत.

Meeting No : 1 Minutes of THE MEETNG Date- 2021-22

दिनांक 8।७।२०२१ रोजी महाविद्यालयात माजी विद्यार्थिनी संघटनेची सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील पहिली सभा संपन्न झाली. यात विविध विषयांवर सखोल व सकारात्मक चर्चा होऊन मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व समिती सदस्यांच्या सहविचाराने विषय निहाय ठरावास मंजूरी मिळाली. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अनु.क्र. | सदस्यांचे नाव | पद | सही. |
|---|---|---|---|
| १ | प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे | अध्यक्ष. | [signature] |
| २ | सौ. मंजुषा तुकाराम शिंदे | उपाध्यक्ष | [signature] |
| ३ | डॉ. रजनी जयंत दळवी | सचिव. | [signature] |
| ४ | सौ. यशवंती रामचंद्र घत्तुरे | सदस्य. | [signature] |
| ५ | सौ. वैशाली सुदर्शन ठाकुर | सदस्य. | [signature] |
| ६ | डॉ. शिवानंद बाबुराव भाजे. | सदस्य | [signature] |
| ७ | डॉ. शंकर शिवाजी राजे. | सदस्य | [signature] |
| ८ | सौ. पुष्पलता मार्कंडेय गुंडेली. | सदस्य | [signature] |
| ९ | सौ. अरुणा गोवर्धन कोडम. | सदस्य | [signature] |
| १० | सौ. स्नेहा नागनाथ मेहेरकर | सदस्य | [signature] |
| ११ | कु. काजल हणमंतु दाते. | सदस्य. | [signature] |

दिनांक ३।७।२०२१ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे ठराव व कार्यवृत्तांत खालील प्रमाणे.

विषय क्र. १ — मागील सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे बाबत.

ठराव क्र. १ — दिनांक ३।७।२०२१ रोजी झालेल्या माजी संघटना विभाग बैठकीचे इतिवृत्तांत डॉ. रजनी दळवी यांनी वाचन केले आणि मा. प्राचार्य आणि सर्व समिती सदस्यांनी यास मंजूरी दिली.

विषय क्रमांक २ — वर्कशॉप्स् व सेमीनार घेणे बाबत.

ठराव क्रमांक २ — महाविद्यालयीन जीवना मध्ये विद्यार्थिनींच्या कला गुणांना, त्यांच्या व्यक्तीमत्व विकासाला चालना मिळण्यासाठी अनेक उपक्रम राबविले जातात. विविध विषयांचे तज्ञ Subject experts, प्रेरणादायी व्यक्तीमत्व इत्यादि लोकांचे मार्गदर्शन विद्यार्थिनींना मिळून त्यांच्या जीवना मध्ये अमुलाग्र असा बदल व्हावा या हेतूने, माजी विद्यार्थिनी-संघटना यांच्या वतीने विविध विषयांचे workshops व seminars

यांनी आयोजन व नियोजन करावे असे मा. प्राचार्य व सर्व समिती सदस्यांच्या सकारात्मक विचाराने ठरले. व त्याप्रमाणे तज्ञ लोकांशी चर्चा करून कार्यक्रमांची रुपरेषा ठरवावी असे मा. प्राचार्य डॉ. शेंडगे सरांनी, सचिवा डॉ. रजनी ढवी यांना सांगितले. व त्याप्रमाणे Seminars व workshops चे विषय ठरवावेत हेही सांगितले.

विषय क्रमांक ३ - Womens Empowerment and Employability Skill Development Cell अंतर्गत शिबीर घेणे बाबत.

ठराव क्रमांक ३ - महाविद्यालया मध्ये, Women's Empowerment and Employability Skill Development Cell अंतर्गत विद्यार्थिनींच्या सर्वांगीण जडण-घडणी साठी अनेक शिबीरांचे आयोजन केले जाते. या विभागा अंतर्गत अनेक उद्योजकां बरोबर सामंजस्य करार (MOU) विविध उद्योग व्यावसायीक, महाविद्यालयाशी सहकार्य करण्यास नेहमीच तत्पर असतात. प्रामुख्याने चंद्रिका चव्हाण उद्योगपतींनी, बोहेमी मेडिकल डिस्ट्रीब्युटर्स, केंद्र शासनाचे Skill Development training centre, Global Talent training इन्स्टीट्युट, डी.बी. फाउंडेशन असे अनेक नामवंत कंपन्या महाविद्यालयाशी जोडलेल्या आहेत. या द्वारे विद्यार्थिनींचे Campus Interview घेतले जातात. म्हणून सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षा करीता ( ते १५ दिवसांचे उद्योजक व्यवसाय शिबीर घ्यावे असे सर्वानुमते ठरले.

विषय क्रमांक ४ - महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनींच्या On-Line Meeting व भेटण्या बाबत.

ठराव क्रमांक ४ - महाविद्यालयाच्या सर्व शाखेच्या माजी विद्यार्थिनी सोलापूर जिल्ह्यातील विविध भागात, तसेच राज्यातील विविध ठिकाणी, व्यवसायाशी संबधीत, लग्नानंतर स्थायीक झालेल्या किंवा वडिलांच्या बदली निमित्त स्थलांतरीत झालेल्या आहेत. त्यांच्याशी संवाद साधावा, त्या सध्या काय करतात, महाविद्यालया विषयीची आपुलकीची भावना निर्माण व्हावी, संलग्नता वाढावा, आजी विद्यार्थिनींच्या मनात आपल्या Senior वर्गा साठी मैत्रीची भावना निर्माण व्हावी या हेतूने Online माजी विद्यार्थिनींना एकत्र करून त्यांच्याशी Contact करावा, त्यांच्या विषयीची माहिती मिळवावी असे सर्वानुमते ठरले.

विषय क्रमांक ५ — मा. अध्यक्षांच्या परवानगीने, आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करणे बाबत.

ठराव क्रमांक ५ — विविध विषयांवर सकारात्मक विषयांवर चर्चा झालेली होती. अध्यक्षांव्यतिरिक्त कोणतेही विषय नसल्याने, सौ. मंजुषा शिंदे यांनी (सचिव) सर्व उपस्थितांचे आभार मानून मिटींग संपल्याचे जाहीर केले. व मा. प्राचार्यांनी पुढील मिटींग अॅसोसिएशनची सभा लवकरात लवकर घ्यावी असे सांगितले.

डॉ. रजनी रझ्वी
(सचिव)

डॉ. ॲनी जॉन
(IQAC Co-ordinator)
Dr. Annie John
Co-ordinator, IQAC
A.R. Burla Mahila Varishtha Mahavidyalaya, Solapur.

डॉ. राजेंद्र शेंडगे
(अध्यक्ष)
Dr. Rajendra Shendage
PRINCIPAL
A. R. Burla Mahila Varishtha Mahavidyalaya, Solapur

दिनांक 8।9।2021 रोजी झालेल्या माजी विद्यार्थिनी संघटनेच्या मिटींगचा कार्यवृत्तांत.

दिनांक 8।9।2021 रोजी प्रा. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडे सर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मिटींगचा कार्यवृत्तांत खालील प्रमाणे. विषय मिळाय मंजूरी व कार्यवृत्तांत

| | |
|---|---|
| विषय क्रमांक १ - | मागील सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे. |
| ठराव क्रमांक १ व कार्यवृत्तांत | दिनांक ७।१।२०२१ रोजी संपन्न झालेल्या मागील सभेचा इतिवृत्तांत, ॲल्युमिनी असोसिएशनच्या सचिवा डॉ. रजनी दवे यांनी वाचून दाखविला त्यावर प्रा. प्राचार्य व सर्व समिती सदस्य यांच्यात साधक - बाधक चर्चा झाली व सर्वांच्या सहमतीने इतिवृत्तांत वाचून कायम करण्यात आला. |
| ठराव क्रमांक २ व कार्यवृत्तांत | महाविद्यालया मध्ये, दरवर्षी विविध उपक्रमा अंतर्गत अनेक सेमीनार, वर्कशॉपचे आयोजन व नियोजन केले जाते. जेणे-करून विद्यार्थिनींच्या व्यक्तीमत्वा मध्ये भर पडावी व त्यांना सक्षमपणे जीवन जगता यावे हा प्रमुख हेतू. त्याचाच एक भाग म्हणजे workshops व सेमीनारसचे नियोजन. त्याप्रमाणे महाविद्यालयात नियोजन केले गेले. त्यानुसार Family Planning Association of India व के. आर. बुर्ले महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने Population Explosion In India या विषयावर workshops चे नियोजन करावयाचे ठरले. त्याचबरोबर माजी विद्यार्थिनी व माजी विद्यार्थिनी संघटनेच्या सदस्या कु. काजल दाते व कु. सोनाली भुगापाटील यांच्या सहकार्याने ३।१०।२०२१ ते २८।१०।२०२१ या कालावधीत खेळाडू विद्यार्थिनींसाठी Sports Coaching Camp चे नियोजन केले गेले. त्याप्रमाणे त्यांना पत्र देऊन त्यांच्याशी विचार विनिमय करून महाविद्यालयातील खेळाडू विद्यार्थिनींची यादी तयार केली गेली व त्याप्रमाणे workshops चे वेळापत्रक ठरवले व कार्याची पुर्तता केली. |
| ठराव क्रमांक ३ व कार्यवृत्तांत - | Womens Empowerment and Employability Skill Development cell महाविद्यालयात अत्यंत actively काम करत असते. विविध इंडस्ट्रीयलस्, स्कूलस्, बँक, Small Scale Industry विविध व्यवसायाभिमुख कार्यक्षेत्रा मध्ये महाविद्यालयीन विद्यार्थिनींचे Placements होण्यासाठी Womens Empowerment and Employability Skill Development cells च्या अंतर अनेक उपक्रमांचे, workshops, seminars चे नियोजन केले जाते. त्याचाच एक भाग म्हणून २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात National Skill |

Development centre, Delhi (कौशल्य भारत योजना) यांच्या अंतर्गत केंद्र सरकारच्या योजना अमलात आणण्यासाठी देशातील युवक-युवतींना कौशल्य प्रशिक्षण देऊन, रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारने Skill India मिशनची सुरुवात केली होती. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयात एकूण 5 certificate courses चे आयोजन केले गेले. त्यात महाविद्यालयातील 438 विद्यार्थिनींनी प्रवेश नोंदवला. त्यात प्रामुख्याने ① Fashion Designing ② Beauty Therapist Beauty and wellness ③ Graphic Designing ④ Accounts Executive ⑤ Secretary Management या कोर्सेसना मान्यता मिळाली.

कार्यवृत्तांत ठराव क्रमांक 4 — महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनींच्या Online Meeting

मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे सर यांच्या मता नुसार, महाविद्यालयातील सर्व शाखेच्या ज्या Pass-out झालेल्या विद्यार्थिनी आहेत त्यांच्याशी सर्व समिती सदस्यांनी संपर्क साधावा जेणेकरून ज्या New admissions घेतलेल्या विद्यार्थिनींना प्रेरणा मिळेल व त्यांच्या मार्गदर्शनाने भविष्य उज्वल घडण्यासाठी सहकार्य होईल. या अनुषंगाने माजी विद्यार्थिनी समितीच्या सचिवा डॉ. रजनी दहवी व सर्व समिती सदस्यांनी महाविद्यालयातील Arts Commerce आणि B.C.A. विभागाच्या Pass-out विद्यार्थिनीमधील "Topmost" विद्यार्थिनींची नावे काढली. Alumni Association Membership form ची त्या साठी मदत झाली. त्यातून शिक्षक, sports trainer, Banking क्षेत्र, Railway Police, SET-NET Exam लघु उद्योग Beauty Parlour, Fashion Designing क्षेत्रात कार्य करणाऱ्या विविध विद्यार्थिनींची लिस्ट काढली. आणि त्यानुसार, महिन्यातून दोनदा अशा प्रेरणादाई विद्यार्थिनींची Online / offline मुलाखत वजा त्यांचे speech होईल अशा पद्धतीने नियोजन केले गेले. व साधारणतः October महिन्यात कु. रईसा माईजाने जी आमची विद्यार्थिनी (SET EXAM - In Hindi) मध्ये यशस्वी झाली. व कु. लक्ष्मी अडेपु (B.A. III) ची विद्यार्थिनी जी कोणताही क्लास न लावता Coaching classes घेऊन यशस्वी होत आहे त्या प्रमाणे त्यांच्याशी संपर्क साधला. व नियोजन केले

विषय क्र. 5 व कार्यवृत्तांत — सर्व विषयांवर सकारात्मक-चर्चा संपन्न झाली. त्याचबरोबर मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे सरांनी पुढील सभा लवकरात-लवकर घ्यावी असे सांगितले. त्यासाठी त्याचीही कार्य पुर्तता केली.

(स्वाक्षरी)
डॉ. रजनी दहवी
(सचिवा)

(स्वाक्षरी)
डॉ. ॲनी जॉन
(आय.क्यु.ए.सी.)
समन्वयक

(स्वाक्षरी)
डॉ. राजेंद्र शेंडगे
(अध्यक्ष- माजी विद्यार्थिनी संघटना)

Meeting No 2.

दिनांक
९/०२/२०२२

माजी विद्यार्थिनींच्या सर्व समिती सदस्यांना कळविण्यात येते की माजी विद्यार्थिनी संघटना सभासदांची सभा दिनांक ५/०४/२०२२ रोजी मा. प्राचार्यांच्या कक्षात संपन्न होत आहे. सदर सभा बरोबर दुपारी २.०० वाजता सुरु होईल. तरी सर्व समिती सदस्यांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

[signature]
डॉ. रजनी दळवी
(सचिव- माजी विद्यार्थिनी संघटना)

A. R. Burla Mahila Mahavidyalaya
ARBM
Solapur

[signature]
प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे
(चेअरमन)

## विषयसूची (AGENDA OF THE MEETING)

विषय क्रमांक १ – मागील सभेच्या इतिवृत्तांत वाचून कायम करणे बाबत.
विषय क्रमांक २ – माजी विद्यार्थिनी संघटना बँक खाते उघडणे बाबत.
विषय क्रमांक ३ – माजी विद्यार्थिनी मेळावा घेणे बाबत.
विषय क्रमांक ४ – जी. टी. टी. फांउडेशन अंतर्गत वर्कशॉप्स घेणे बाबत.
विषय क्रमांक ५ – मॅफकोम बुके प्रशिक्षण सुरु करणे बाबत.
विषय क्रमांक ६ – माजी विद्यार्थिनींची प्रेरणादायी ओळख कार्यक्रम घेणे बाबत.
विषय क्रमांक ७ – मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषया बाबत.

[signature]
डॉ. रजनी दळवी
(सचिव- माजी विद्यार्थिनी संघटना)

[signature]
डॉ. ॲनी जॉन
(आय. क्यु. ए. सी समन्वयक)
Dr. Annie John
Co-ordinator, IQAC
A.R. Burla Mahila Varishtha
Mahavidyalaya, Solapur.

[signature]
प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे.
(अध्यक्ष)
Dr. Rajendra Shendage
PRINCIPAL
A. R. Burla Mahila Varishtha
Mahavidyalaya, Solapur

Meeting No: 2 Minutes of The Meeting.
2021-22

दिनांक ५/१०/२०२२ रोजी, महाविद्यालयातील माजी विद्यार्थिनी संघटना विद्यार्थिनींची २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील द्वितीय सभा संपन्न झाली. या सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सभासदांचे नाव | पद | सही. |
|---|---|---|---|
| १ | प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे | अध्यक्ष | [signature] |
| २ | सौ. शिंदे मंजुळा | उपाध्यक्ष | मंजुळा शिंदे |
| ३ | डॉ. दळवी रजनी | सचिव | [signature] |
| ४ | सौ. धनुरे यशवंती | सहसचिव | Dhanure |
| ५ | सौ. शंकुर वैशाली | खजिनदार | [signature] |
| ६ | डॉ. मांजे शिवानंद | सदस्य | [signature] |
| ७ | डॉ. राज शंकर | सदस्य | [signature] |
| ८ | सौ. गुंडेली पुष्पलता | सदस्य | [signature] |
| ९ | सौ. कडम अरुणा | सदस्य | Kdata |
| १० | सौ. मेहेरकर स्नेहा | सदस्य | Aledam |
| ११ | कु. शेख काजल | सदस्य | Smeheny / Kuly |

दिनांक ५/१०/२०२२ रोजी संपन्न झालेल्या, माजी विद्यार्थिनी संघटना सभेचे ठराव व कार्यवृत्तांत खालील प्रमाणे.

ठराव क्रमांक १ — मागील सभेच्या इतिवृत्तांत वाचून कायम करणे बाबत. दिनांक ०७/३/२०२२ रोजी संपन्न झालेल्या माजी विद्यार्थिनी संघटनेच्या इतिवृत्तांत मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे सर यांच्या अध्यक्षतेखाली वाचून कायम करण्यात आले.

विषय क्रमांक २ — माजी विद्यार्थिनी संघटना बँक खाते उघडणे बाबत.

ठराव क्रमांक २ — महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी संघटना यांचे बँक खाते असणे आवश्यक आहे. असे IQAC Co-ordinator डॉ. मॅनी जॉन यांनी सांगितले. त्याच बरोबर बँक खाते उघडण्या विषयीची भूमिका व त्याचे महत्त्व प्रतिपादन केले. त्याच बरोबर, NAAC च्या दृष्टीकोनातून व महाविद्यालयाच्या एकूण Development करीता, माजी विद्यार्थिनींच्या निधी

असणे किती महत्वाचे आहे या विषयी प्रा. प्राचार्य डॉ. रजित शेंडगे सरांनी सर्व समिती सदस्यांना विश्वासपूर्वक सांगितले. अत्यंत सकारात्मक झालेल्या या चर्चे बाबत, सर्व समिती सदस्यांनी बँक खाते उघडणे बाबत तात्काळ मंजुरी दिली. माजी विद्यार्थिनी संघटना खजिनदार सौ. वैशाली अंकुश यांनी त्या स्वतः कार्यरत असलेल्या उमामा चव्हाण बँकेत खाते उघडणे बाबत विनंती केली. जेणेकरून बँकेतील व्यवहार करणेस सोपे व सुरक्षित जाईल. या सर्व बाबींना सर्व समिती सदस्यांनी मंजुरी दिली व सर्वांच्या एकमताने या बाबत ठराव मंजुर केला.

विषय क्रमांक ३ - माजी विद्यार्थिनी मेळावा घेणे बाबत.
ठराव क्रमांक ३ - महाविद्यालयाच्या तिनही शाखेच्या (B.A. B.Com. BCA) ज्या Pass-out विद्यार्थिनी आहेत, व विविध ठिकाणी कार्यरत आहेत, अशा विद्यार्थिनींच्या आढावा घेणे व त्यांचा प्रेरणादायी प्रवास, महाविद्यालयाच्या आजी विद्यार्थिनींस मार्गदर्शक होईल या हेतुने व NAAC च्या दृष्टिकोनातुन महाविद्यालयात माजी विद्यार्थिनींचा मेळावा घेणे आवश्यक आहे असे मा. प्राचार्य डॉ. रजित शेंडगे सरांनी सांगितले. या वरती माजी विद्यार्थिनी संघटनेच्या सचिवा डॉ. रजनी दळवी यांनी सांगितले की, दरवर्षी हा मेळावा अत्यंत संपन्न होत असतो. याही वर्षी मा. प्राचार्यांच्या अध्यक्षते खाली मेळावा यशस्वी करु असे सर्व समिती सदस्यांना सांगितले. यास सर्वांनी एकमताने मंजुरी दिली व तसा ठराव मंजुर करण्यात आला.

विषय क्रमांक ४ - G.T.T. Foundation's वर्कशॉप घेणे बाबत.
ठराव क्रमांक ४ - महाविद्यालयात माजी विद्यार्थिनी संघटना व विविध इन्स्टिट्युशन्स एकत्रितपणे अनेक उपक्रमामध्ये सहभागी होत असतात. जेणे करुन विद्यार्थिनींच्या व्यक्तीमत्वाचा विकास व्हावा व त्यांना सक्षमपणे जीवन जगता यावे. याच अनुषंगाने G.T.T Foundation (Global Trading Trade पुणे) या संस्थेच्या संचालिका विजया चव्हाण यांनी मा. प्राचार्यांशी संपर्क साधला असता, महाविद्यालयात G.T.T. Foundation's च्या वतीने, 15 Days workshop घेण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. व सर्वांनी यास एकमताने मंजुरी दिली. मा. प्राचार्यांनी डॉ. रजनी दळवी (Convenor of empowerment

of Employbility skill Development Committee च्या अंतर्गत 15 Days Short term Course सुरु करावा असे सांगितले. व या सर्व बाबींसाठी सर्व समिती सदस्यांनी एकमताने मंजुरी दिली.

विषय क्रमांक ५ - नॅपकीन बुक प्रशिक्षण सुरू करणे बाबत

ठराव क्रमांक ५ - महाविद्यालयात विविध योजनांच्या माध्यमातून विद्यार्थिनींच्या जडण-घडणीसाठी विविध उपक्रम राबविले जातात. या सर्व माजी विद्यार्थिनी संघटना कार्यरत असतात. Small scale industry, fashion Designing, Beauty parlour इत्यादि बाबींचे कोर्सेस नियमितपणे चालू (वर्कशॉप) असतात. यातीलच एक नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणजे 'नॅपकीन बुक प्रशिक्षण' वर्ग. या साठी सौ. अरूणा कोडम आणि कु. पुष्पलता गुंडेली यांनी 'शकुंतला लघुउद्योग प्रशिक्षण संस्थेचे' संचालक श्री. ज्ञानेश्वर मायकल यांचे नाव सुचविले असता मा. प्राचार्यांनी या उपक्रमा संदर्भात डॉ. रश्मी दडवी यांना श्री. ज्ञानेश्वर मायकल यांच्याशी संपर्क साधावयास सांगितले. व सदर उपक्रम महाविद्यालयात सुरु करण्यासाठी सर्व समिती सदस्यांनी एकमताने मंजुरी दिली.

विषय क्रमांक ६ - माजी विद्यार्थिनींची प्रेरणा दायी ओळख कार्यक्रम घेणे बाबत.

ठराव क्रमांक ६ - महाविद्यालयातील माजी विद्यार्थिनी अनेक नामांकित संस्था वर उच्चपदावर कार्यरत आहेत. काहींनी Net/Set सारख्या अवघड व eligible entrance Exam पास केलेल्या आहेत. अनेक विद्यार्थिनी महाराष्ट्रातील अनेक उद्योग समुहात जबाबदारीने आपले skill develop करून स्वतःच्या पायावर मोलाची भर टाकत आहे. अनेक विद्यार्थिनी Police department, Junior - Senior College, शाळांमध्ये शिक्षीका म्हणून आपले योगदान देत आहेत. यांच्या पैलूंचा स्पर्श आजी विद्यार्थिनींना व्हावा या हेतूने, माजी विद्यार्थिनी संघटना सभासदांनी ठरविले की, शैक्षणिक वर्षातील सुरवाती पासून दर महिन्याला किमान एक ते दोन विद्यार्थिनींचे प्रेरणा दायी संवाद घेणार. online किंवा offline platform वर कार्यक्रमांचे नियोजन व्हावे असे सर्वांच्या एकमताने ठरले व तसा ठराव मंजूर करण्यात आला.

विषय क्रमांक ८ - मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषया बाबत चर्चा करणे बाबत.
- अनेक बाबींवर सकारात्मक चर्चा होऊन, बैठकीच्या विषयांवर ठराव मंजूर झाले व पुढील बाबींवर, योग्य तो अभ्यासपूर्वक नियोजन करणे कार्यपुर्तता करावी असे मा. प्राचार्यांजी संबंधीत समिती सदस्यांना सांगितले. त्याचबरोबर पुढील बैठकीचे नियोजन लवकरात लवकर करावे असे ही सांगितले.

समिती सचिवा डॉ. रजनी दळवी यांनी मा. प्राचार्य व सर्व समिती सदस्यांचे आभार मानले. व बैठक संपल्याचे जाहीर केले.

डॉ. रजनी दळवी
(सचिव. माजी विद्यार्थिनी संघटना)

डॉ. ॲनी जॉन
(आय. क्यु. ए. सी. समन्वयक)
Dr. Annie John
Co-ordinator, IQAC
A.R. Burla Mahila Varishtha
Mahavidyalaya, Solapur.

प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे
(अध्यक्ष)
Dr. Rajendra Shendage
PRINCIPAL
A. R. Burla Mahila Varishtha
Mahavidyalaya, Solapur

Meeting No 2 : Action Taken Report (कार्यवृत्तांत)

दिनांक ५।२।२०२२ रोजी मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे सर यांच्या कक्षेत माजी विद्यार्थिनी संघटनेची २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील द्वितीय सभा संपन्न झाली. व विषयांवर ठरावही मंजूर झाले. सदर सभेचा कार्यवृत्तांत

विषय क्रमांक १ - मागील सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करण्यात आला.

विषय क्रमांक २ - माजी विद्यार्थिनी संघटना बँक खाते उघडणे बाबत
कार्यवृत्तांत - सदर विषयावर, सर्व माजी विद्यार्थिनी संघटनेच्या सदस्यांनी बँक खाते उघडण्यास मंजूरी दिला असता, समिती सचिवा डॉ. रजनी दळवी यांनी प्रत्यक्ष उमा मा चव्हाण Co-Operative Bank संचालक श्री. बाबुचव्हाण यांच्याशी

संपर्क साधला असता त्यांनी श्री. आर. बुर्ले महिला वरिष्ठ महाविद्यालय माजी विद्यार्थिनी संघटना बँक खाते उघडण्यास परवानगी दर्शविली व त्यासाठी documentation काय करायचे हेही त्यांनी सांगितले. त्याचबरोबर माजी विद्यार्थिनी संघटनेचे Registration दिनांकाचाही उल्लेख करावयास सांगितले. त्याप्रमाणे डॉ. रजनी दळवी यांनी कार्यपूर्तता केली.

विषय क्रमांक ३ — माजी विद्यार्थिनी मेळावा घेणे बाबत.
(कार्यवृत्तांत) — सभेमध्ये ठरल्याप्रमाणे, मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे सर यांनी सर्व समिती सदस्यांना यशस्वी माजी विद्यार्थिनींना संपर्क साधावा असे सांगितले असता समिती अध्यक्षा सौ. मंजुळा बिंदे यांनी माजी विद्यार्थिनी संघटना विद्यार्थिनींचा 'whatsapp group' तयार केला. या संदर्भात डॉ. रजनी दळवी यांनी सर्व प्राध्यापकांची meeting घेतली असता सर्व प्राध्यापकांनी आपल्या विषयाशी निगडीत विद्यार्थिनींशी संपर्क साधला व त्याप्रमाणे डॉ. दळवी यांनी सर्व faculty च्या विद्यार्थिनींशी संपर्क साधला. प्रामुख्याने, २०१८ ते २०२२ पर्यंतच्या Batch च्या Arts / Commerce व B.C.A. Departments विद्यार्थिनींशी संपर्क साधून मेळावा आयोजना बाबत माहिती दिली. व त्याप्रमाणे मेळाव्याचे नियोजन केले.

विषय क्रमांक ४ — G.T.T. Foundation workshops घेणे बाबत.
कार्यवृत्तांत — Global Trading Trade पुणे या उद्योग समूहाच्या वतीने महाविद्यालयात १५ दिवसांचे G.T.T. Foundation चे workshops सुरु व्हावे हा ठराव मंजूर झाला असता डॉ. रजनी दळवी यांनी G.T.T. Foundation Pune यांच्या संचालिकांशी संपर्क साधला असता त्यांनी श्री. आर. बुर्ले महिला महाविद्यालय व G.T.T. Foundation यांच्यामध्ये अगोदर MOU (सामंजस्य करार) करावा असे सांगितले व त्याप्रमाणे लवकरच प्रशिक्षण सुरु करावे असे सांगितले. जेणे करून महाराष्ट्रातील विविध industry / company मध्ये विद्यार्थिनींचे campus interview होऊन त्यांना फायदा होईल. त्याप्रमाणे समिती सचिव डॉ. रजनी दळवी यांनी कार्यपूर्तता केली.

विषय क्रमांक ५ — नॅपकीन बुके प्रशिक्षण सुरु करणे बाबत.
कार्यवृत्तांत — महाविद्यालयात नॅपकीन बुके प्रशिक्षण सुरु करावा असे मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे सरांनी सांगितले असता, डॉ. रजनी दळवी, प्रा. अरुणा कोळप यांनी NAPKIN BUKE चे उद्योजक श्री. ज्ञानेश्वर मायकर यांच्याशी संपर्क साधला. व त्यांनी महाविद्यालयात लवकरच याचे प्रशिक्षण सुरु करण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली.

विषय क्रमांक ६ व – माजी विद्यार्थिनींची प्रेरणादायी ओळख करून देणे बाबत.

कार्यवृत्तांत – महाविद्यालयातील तीनही शाखेच्या (B.A./Commerce/BCA) यशस्वी विद्यार्थिनींची प्रेरणादायी ओळख कार्यक्रम व्हावा असे सर्वानुमते ठरले असता उपाध्यक्ष सौ. मंजुषा शिंदे यांनी माजी विद्यार्थिनी संघटनेचा whatsapp group तयार केला व सर्व माजी विद्यार्थिनींनी डॉ. रजनी दव्वी यांना संपर्क साधावा असे सांगितले जेणेकरून संपर्कात नसलेल्या माजी विद्यार्थिनीही या योजनेमध्ये समाविष्ट होतील. त्यानुसार अनेक यशस्वी विद्यार्थिनींची नावे मिळाली आणि तात्काळ त्यांनीही त्यांच्या सवडीनुसार महाविद्यालयात आजी विद्यार्थिनींशी संवाद साधण्यासाठी यायचे कबूल केले. ज्या विद्यार्थिनी बाहेर गावी आहेत त्यांनी online Platform वर विद्यार्थिनींशी संवाद साधण्यासाठी यायची तयारी दर्शविली व त्यानुसार कु. रईसा आईजान (Hindi subject – SET उत्तीर्ण) व कु. नव्या आडेपु (English subject) यांनी यशस्वी विद्यार्थिनींची प्रेरणादायी ओळख या कार्यक्रमासाठी कॉलेजच्या नियोजनानुसार यायचे कबूल केले. व त्याप्रमाणे कार्यक्रमाचे Shedule ठरविण्यात येऊन कार्यपूर्तता केली.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने डॉ. रजनी दव्वी यांनी सर्वांचे आभार मानून सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले

डॉ. रजनी दव्वी
(सचिव - माजी विद्यार्थिनी संघटना)

डॉ. ॲनी जॉन
(आय.क्यु.ए.सी. समन्वयक)
Dr. Annie John
Co-ordinator, IQAC
A.R. Burla Mahila Varishtha
Mahavidyalaya, Solapur.

प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे
(अध्यक्ष)
Dr. Rajendra Shendage
PRINCIPAL
A. R. Burla Mahila Varishtha
Mahavidyalaya, Solapur


Google
RAVIWA
Solapur, Maharashtra, India
Bula Bhai Chowk, Raviwar Peth, opposite C.T Bus Depot,
Police Lines, Solapur, Maharashtra 413005, India
Lat N 17° 40' 38.964"
Long E 75° 55' 6.7332"
24/02/21 09:46 AM


Shot on realme 2
By Deepak G.




Shot on realme 2